**प्रेसनोट** दि. १५/०१/२०२५

अॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून सजा फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे येथे फेरफार व सातबारा नोंद करण्याकरीता संबंधीत तलाठयासाठी लाच मागणी करुन लाच स्विकारणा-या खाजगी इसमावर कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४२ वर्ष |
| आरोपीचे नाव व कार्यालय | ठकसेन ऊर्फ तुषार मारुती गलांडे, वय ४२ वर्ष, रा. नारायण नगर, फुरसुंगी गाव, ता हवेली, जि. पुणे (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये लाच मागणी |
| स्वीकारलेली लाच रक्कम | पहिला हप्ता ५,०००/- (पाच हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | दि. १५/०१/२०२५ रोजी |
| सापळा दिनांक | दि. १५/०१/२०२५ |
| ठिकाण | तलाठी कार्यालय फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे. |
| तपास अधिकारी | श्री. अमोल भोसले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. पुणे. (मो.क्र. ९५२७३१७५२७) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांना श्री. धनंजय रामचंद्र बेनकर, रा. धायरी गाव, पुणे यांनी खरेदी केलेल्या गट नंबर ३०९, सर्व्हे नं. १३८ मिळकत संबंधातील फेरफार आणि सातबारा नोंदणीबाबतचे काम करण्याचे अधिकार शासकीय अधिकार पत्राद्वारे दिले आहेत. त्या अनुषंगाने श्री. बेनकर यांनी खरेदी केलेल्या जागेचा फेरफार धरुन सातबारा उता-यावर नोंद करण्यासाठी तक्रारदार पाठपुरावा करत होते. त्यानुसार तक्रारदार हे तलाठी कार्यालय, फुरसुंगी येथे गेले असता खाजगी इसम ठकसेन ऊर्फ तुषार गलांडे यांनी संबंधीत तलाठी चौधरी यांच्यासाठी तक्रारदार यांच्याकडे फेरफार नोंद व सातबारा नोंद करणेकामी १०,०००/- रुपयांची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, खाजगी इसम ठकसेन ऊर्फ तुषार गलांडे यांनी संबंधीत तलाठी आणि वरच्यांना देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे फेरफार नोंद व सातबारा नोंद करणेकामी १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन, तक्रारदार यांचेकडून त्याचा पहिला हप्ता ५,०००/- रुपये (पाच हजार) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्याना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले असून, खाजगी इसम ठकसेन ऊर्फ तुषार गलांडे यांचेविरुद्ध हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.